

**CII India Business Hub at Davos!**

**India Flag is Flying High at the**

# World Economic Forum Annual Meeting 2024

# MAGNETIC MAHARASHTRA

16TH TO 18TH JANUARY, 2024




# जागतिक आर्थिक परिषद २०२४

# दावोस, स्वित्झरलँड

## महाराष्ट्र राज्याचे सुसज्ज दालन









# जागतिक आर्थिक परिषद २०२४ महाराष्ट्र राज्य पॅव्हेलियनचे उद्घाटन



दावोस येथील ' जागतिक आर्थिक परिषद २०२४' च्या महाराष्ट्र राज्य पॅव्हेलियनचे उद्घाटन  मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी मा.ना.श्री.उदय सामंत, मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य तसेच अप्पर मुख्य सचिव – श्री.भूषण गगराणी, प्रधान सचिव- उद्योग श्री.हर्षदीप कांबळे, सीईओ-म.औ.वि.मं श्री. विपीन शर्मा आदी उपस्थित होते

# " महाप्रीत "




दावोस येथे होणाऱ्या जागतिक आर्थिक परिषदेच्या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे शिष्टमंडळ तसेच एम.एम.आर.डी.ए. तर्फे श्री असिमकुमार गुप्ता, श्री संजय मुखर्जी, श्री. अश्विनी मुदगल, श्री शंकर देशपांडे, डॉ अमोल शिंदे, व महाप्रित तर्फे श्री.पुरषोत्तम जाधव, श्री.सुभाष नागे, श्री. डी.सी.पाटील व श्री दिपक कोकाटे, अधिकारी देखील यात सहभागी झाले होते.

दावोसमधील जागतिक आर्थिक परिषद २०२४ मधून महाप्रीत मार्फत शाश्वत विकास व नावीन्यपूर्ण प्रकल्प ( sustainable infrastructure) क्षेत्रात सुमारे ७२ हजार कोटीची गुंतवणूक होणार आहे. भारताच्या शाश्वत विकास ध्येया (Sustainable Development Goals ) ची कास धरत हरित ऊर्जा आणि शाश्वत तंत्रज्ञान, परवडणारी घरे, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऊर्जा नियोजन, नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत – ग्रीन हायड्रोजन, बॅटरी एनर्जी स्टोरेज , घनकचऱ्यापासून इंधन निर्मिती, घनकचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती, त्याचबरोबर सौर व पवन ऊर्जेचे एकत्रीकरण करणे यांसारखे नावीन्यपूर्ण क्षेत्रात महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात मूल्यवर्धन करणारे ग्रीन एनर्जी ३०००, जर्मनी , प्रेडिकशन मर्या., हीरो फ्यूचर एनर्जी, स्कॅनडीनेवियन ई. एस. जी., अमेरिका, वि. एच. एम. पोर्तुगाल, पानीटेक पावर या कंपन्यांनी गुतंवणूकी संदर्भात स्वारस्य दाखविले आहे.

**“ महाप्रीत ”**

| अ.क्र | गुंतवणुक करणारी कं. | एकूण रुपये गुंतवणुक | विषय |
|---|---|---|---|
| १ | ग्रीन एनर्जी ३०००, जर्मनी | ४०,००० कोटी | शाश्वत प्रौद्योगिकी, हायड्रोजन, सौर ऊर्जा, |
| २ | प्रेडिकशन मर्या. | ४,००० कोटी | कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ऊर्जा नियोजन, नविकरणीय ऊर्जा क्षमता विश्लेषण तसेच निर्णय प्रक्रियेचा विकास, |
| ३ | हीरो फ्यूचर एनर्जी | ८,००० कोटी | हायड्रोजन, सौर ऊर्जा, बॅटरी स्टोरेज , मिनी ग्रिड, स्मार्ट ग्रिड, |
| ४ | स्कॅनडीनेवियन ई. एस. जी., अमेरिका | १६,००० कोटी | परवडणारी घरे, कचऱ्यांपासून इंधन व कचऱ्यांपासून ऊर्जा निर्मिती |
| ५ | वि. एच. एम. पोर्तुगाल | ४,००० कोटी | पायाभूत सुविधा, प्रौद्योगिकी क्षेत्रात प्रकल्प नियोजन व व्यवस्थापन |
| ६ | पानीटेक पावर | ४,००० कोटी | बॅटरी स्टोरेज , मिनी ग्रिड, स्मार्ट ग्रिड, ऊर्जा बचत यंत्रणा, व वायु प्रदूषण मानके निर्मिती |
| एकूण सुमारे रु.७२,०००/- कोटी) | | | |

## “ महाराष्ट्राची उद्योग भरारी ”

दावोस येथील 'जागतिक आर्थिक परिषद २०२४ मध्ये महाराष्ट्रात परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात झाली असून या वर्षी ३ लाख २३३ कोटी रुपयांची गुंतवणूक उद्योग विभागाच्या अधिनस्त महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत व महाप्रित मार्फत ७२ हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त परदेशी गुंतवणुकीचे सामंजस्य करार मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मा.ना.श्री.उदय सामंत, मंत्री, उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत झाले.

या करारांमुळे राज्यात जवळपास २ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण होणार आहे. महाराष्ट्रात उद्योगांसाठी असलेल्या पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ असून महाराष्ट्रात एक इको सिस्टिम आहे. जेम्स आणि ज्वेलरी, माहिती तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, हरित ऊर्जा, पेपर आणि पल्प, खार उद्योग, डेटा सेंटर, इन्फ्रास्ट्रक्चर अशा विविध सेक्टरमध्ये गुंतवणूक केली आहे.अमेरिका, स्वित्झर्लंड, सिंगापूर, दक्षिण कोरीया या देशांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून यूएसई,ओमान या देशांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास पसंती दर्शवली आहे. आर्सेअर मित्तल, जिंदाल, गोदरेज, अदानी या कंपन्यांनी सुद्धा महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त केली आहे.









# धन्यवाद

# प्रेरणादायी व दिशादर्शक

बिपीन श्रीमाळी

> **महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) ही कंपनी इतर शासकीय महामंडळांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरणारी आहे. महाप्रित ही महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची सहयोगी कंपनी असून या कंपनी अंतर्गत अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. एप्रिल २०२१ मध्ये महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्यौगिकी मर्यादित अर्थात महाप्रित ही वेगळी उपकंपनी स्थापन करण्यात आली आहे.**

प्रत्येक प्रकल्पाची सद्य:स्थिती व हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठीचे नियोजन याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गतचे लाभ थेट मागासवर्गीयांना होणार असून त्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होणार आहे. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या असणाऱ्या भागभांडवलाबाबत तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाबाबत सचिव, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे.

## हाती घेतलेले प्रकल्प

महाप्रितने सौरऊर्जा प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहने व चार्जिंग स्टेशन प्रकल्प, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क व डेटा सेंटर प्रकल्प, महादीप, कृषिमूल्य साखळी, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पांतर्गत बायोगॅस व जैविक खते प्रकल्प, महाप्रित अल्टरनेटिव्ह इन्फ्रास्ट्रक्चर फंड (मैफ), नवयुग लाभार्थी नोंदणीकरण प्रक्रिया, अल्टरनेटिव्ह इनोव्हेटिव्ह जनरेशन ऑफ एम्प्लॉयमेंट प्रोग्रॅम (आयगॅप), कोकण आपत्ती सौम्यीकरण आदी प्रकल्पाचा समावेश आहे. महाप्रितकडून निधी उभारल्यावर अपारंपरिक व नविनीकरण ऊर्जा (सोलर पार्क), कृषी प्रक्रिया उद्योग, सॉफ्टवेअर पार्क, राखेपासून विविध वस्तूंची निर्मिती, रस्ते बांधकाम, गृहनिर्माण, इमर्जिंग टेक्नोलॉजीशी संबंधित म्हणजे रोबोट, ड्रोनसह नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योग, पर्यावरणाशी संबंधित नवीन उद्योग उभारण्यासाठी मदत केली जाणार आहे.

## २५ हजार ३६१ कोटींचे करार

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादितने मुंबईत आयोजित केलेल्या महाप्रित हरितनिधी गुंतवणूक बैठकीत विविध २२ प्रकल्पांसाठी तब्बल २५ हजार ३६१ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन, रूरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन, इरेडा, ग्रो बेटर ॲग्री ओव्हरसीज, इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांच्यासह अनेक नामवंत कंपन्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## ग्रीन फंड इन्व्हेस्टर मिट-२०२२

महाप्रितने ग्रीन फंड इन्व्हेस्टर मिट-२०२२ आयोजित केली होती. यामध्ये विकासक व गुंतवणूक संस्था यांना एकाच व्यासपीठावर आणून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीची साखळी निर्माण करण्याचा संकल्प महाप्रितने केला. या प्रकल्पातून मिळणारे अतिरिक्त उत्पन्न महात्मा फुले विकास महामंडळाच्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी वापरण्यात येईल. जेणेकरून मागास, दुर्बल घटकांना उत्पन्नाची साधने उपलब्ध होऊन त्यांची सर्वांगीण प्रगती होईल.

## स्थानिक स्वराज्य संस्थेबरोबर करार

पुणे महानगरपालिकेबरोबर ऊर्जा बचत, कमांड कंट्रोल सिस्टिम, ५० मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प इत्यादी महत्त्वाकांक्षी प्रकल्प महाप्रितने हाती घेतले आहेत. त्याचे कामकाजही गतीने सुरू केले आहे. महाप्रित कंपनीने ७ एप्रिल २०२२ रोजी पुणे महानगरपालिकेसोबत ऊर्जेची व ऊर्जा खर्चांचे बचत धोरण यासाठी उपाययोजना करण्यासाठीच्या प्रकल्पांसाठी सामंजस्य करार केला आहे.

नागपूर महानगरपालिकेचे विविध प्रकल्प जसे सौरऊर्जा प्रकल्प, ऊर्जा बचतीचा प्रकल्प, विद्युत वाहन चार्जिंगची पायाभूत सुविधा, कमांड कंट्रोल सिस्टिमची उभारणी व कार्बन उत्सर्जन आणि डी-कार्बोनायझेशन कृतिआराखड्याची अंमलबजावणी करणे इत्यादी प्रकल्प महाप्रिततर्फे राबवण्यात येणार आहेत.

## सामंजस्य करारांसाठीची तयारी

'महाप्रित'ची स्थापना मागासवर्गाच्या कल्याणासाठी झाली. त्यानुसार कंपनीचा नफा हा विशेष वर्गाच्या कल्याणासाठी खर्च

MAHAPREIT

केला जातो. परंतु आता कंपनीने सर्वांना सोबत घेऊन विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळेच कोरोनाकाळात थांबलेल्या कामाचा उपयोग अशा प्रकारच्या




सामंजस्य करारांच्या तयारीसाठी केला. त्यामुळे आज इतिहासात पहिल्यांदाच एवढे मोठे करार झाले आहेत. ऊर्जाक्षेत्र हे नूतनीय उर्जेद्वारे सातत्याने नवीन स्तरावर जात आहे. नवीन तंत्रज्ञान यामध्ये येत आहे. हे सर्व ध्यानात घेऊनच आधुनिकतेचा कास धरणारे हे सर्व करार आहेत.

## करारांमधून रोजगारनिर्मितीची अपेक्षा

सर्वाधिक करार हे नूतनीय ऊर्जा क्षेत्रातील आहेत. साधारण ५० मेगावॅटमागे ८० प्रत्यक्ष रोजगार निर्मित होते. महाप्रित हरितनिधी गुंतवणूक बैठकीत जवळपास तीन हजार मेगावॅट नविनीकरणीय ऊर्जेचे करार झाले आहेत. याखेरीज प्रत्यक्ष रोजगाराच्या तीनपट अधिक अप्रत्यक्ष रोजगार असतात. त्यानुसार हा आकडा फार मोठा असेल. सामंजस्य करारांत काही रस्ते कामांचादेखील समावेश आहे. यासाठीच्या रोजगाराचा आकडा हा नूतनीय ऊर्जेहून अधिक असतो.

## करारांचे निकाल

एकूण करारांत सर्वाधिक करार सौरऊर्जेचे आहेत. सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प तुलनेने लवकर उभे राहतात. पॅनेल बसवून काही पायाभूत सुविधा उभ्या करून तत्काळ निर्मिती करता येते. एकट्या पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने ७ हजार कोटींच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी करार केला आहे. त्यानुसार राज्याच्या नूतनीय ऊर्जा क्षेत्रात सुमारे २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होईल, ज्याचा सर्वाधिक फायदा राज्यातील मागासवर्गीय लोकांना मिळेल.

## पुढील नियोजन

'महाप्रित' ही नूतनीय ऊर्जेसाठी स्थापन झालेली कंपनी असली तरी पायाभूत सुविधा तंत्रज्ञानाचादेखील त्यात समावेश आहे. त्यानुसार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी 'फ्लाय ॲश'चा अधिकाधिक वापर करण्यासाठी कंपनी काम करीत आहे. राष्ट्रीय महामार्ग उभारणीसाठी भूसंपादन करून दिले जाणार आहे. लवकरच डिजिटल विद्यापीठदेखील उभारले जाईल .

## महाप्रित स्टार्टअप ज्ञान केंद्र

मागासवर्गीय घटकांच्या सामाजिक उत्थानाला चालना देण्यासाठी तसेच या प्रवर्गातील व्यक्तींच्या सामाजिक विकासासाठी व्यावसायिक व रोजगारक्षम शिक्षण देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित)च्या अंतर्गत ज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. 'महाप्रित स्टार्टअप ज्ञान केंद्र' या नावाने संस्थेच्या स्वरूपात स्थापित केंद्रामुळे तरुणांना व्यावसायिक संधी देण्यासाठी सक्षम बनवले जाईल.

महाप्रितच्या संचालक मंडळाच्या बैठकीत राष्ट्रीय शिक्षा धोरणाचे (एनईपी) उद्देश पूर्ण करण्यासाठी डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे एक उद्दिष्ट वर्तमान एकूण नोंदणी प्रमाण २६ ते ५० पर्यंत वाढवणे हे असल्याने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. मल्टिपॉइंट एंट्री/एक्झिट आणि अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स, वैयक्तिक शिक्षण या यासारखी इतर उद्दिष्टे डिजिटल विद्यापीठाद्वारे पूर्ण केले जातील. अभ्याससंबंधीचे सर्व कार्यक्रम विद्यार्थिकेंद्रित तर असतीलच पण, ते राष्ट्रीय कौशल्य पात्रता संरचना अनुरूप आणि उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी यांच्याशी जोडलेले असतील. पारंपरिक विद्यापीठाला डिजिटल ॲप्लिकेशन्स म्हणून चालवणाऱ्या सर्व ॲप्लिकेशनचा डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये समावेश करण्यात येणार आहे. ईआरपीएलएमएस, डिजिटल प्रलेख, मूल्यांकनाच्या आधारे रोजगार, इंटर्नशिप हे सर्व मल्टि टेनंट आर्किटेक्चर, मल्टि इन्स्टंस्ड आणि व्हाईट लेबलवरती एकाच प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रित केले जाणार आहेत. या नव्याने उभारण्यात येणाऱ्या केंद्राच्या मदतीने तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जाईल.

## डिजिटल विद्यापीठाचे काम

डिजिटल विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्यातील दुर्बल घटक आणि अनुसूचित जातिघटकांवर विशेष लक्ष केंद्रित करेल. जेणेकरून त्यांच्या अंतर्गत अर्थसाहाय्य (क्रॉस सबसिडी) एसपीव्ही बनवता येईल. त्याचप्रमाणे डिजिटल विद्यापीठाच्या गैरभौतिक मर्यादा मान्य करून त्याद्वारे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ (एमपीबीसीडीसी) आणि महाप्रितच्या दुर्बल घटकांच्या लाभार्थ्यांसाठी संसाधने निर्माण करता येतील.

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाप्रित




# महाप्रितची भरारी प्रेरणादायी



**डॉ. मिलिंद आवताडे**

मुख्य जनसंपर्क अधिकारी,
महापारेषण

**महात्मा** फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) ही कंपनी इतर शासकीय महामंडळांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरणारी आहे. महाप्रित ही महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची सहयोगी कंपनी असून, या कंपनी अंतर्गत अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. एप्रिल २०२१ मध्ये महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित अर्थात महाप्रित म्हणून वेगळी उपकंपनी स्थापन केली आहे.

महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी विभागनिहाय प्रत्येक प्रकल्पाची सद्यस्थिती व हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठीचे नियोजन याबाबतचा कालबध्द कार्यक्रम हाती घेतला आहे. याबाबत शासकीय पातळीवर आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही शासनाच्यावतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

**महाप्रितने हाती घेतलेले प्रकल्प**

प्रामुख्याने महाप्रितने जे प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यामधील सौरऊर्जा प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहने व चार्जिंग स्टेशन प्रकल्प, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क व डेटा सेंटर प्रकल्प, महादीप, कृषीमूल्य साखळी, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पांतर्गत बायोगॅस व जैविक खते प्रकल्प, महाप्रित अल्टरनेटिव्ह इन्फ्रास्ट्रक्चर फंड (मैफ), नवयुग लाभार्थी नोंदणीकरण प्रक्रिया, अल्टरनेटिव्ह इनोव्हेटिव्ह जनरेशन ऑफ एम्प्लॉयमेंट प्रोग्रॅम (आईरॉप), कोकण आपत्ती सौम्यीकरण आदी प्रकल्पाचा समावेश आहे

**महाप्रितला या क्षेत्रात उद्योग शक्य**

महाप्रितकडून निधी उभारल्यावर अपारंपरिक व नविनीकरण ऊर्जा (सोलर पार्क), कृषी प्रक्रिया उद्योग, सॉफ्टवेअर पार्क, राखेपासून विविध वस्तूंची निर्मिती, रस्ते बांधकाम, गृहनिर्माण, इमर्जिंग टेक्नोलॉजीशी संबंधित म्हणजे रोबोट, ड्रोनसह नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित उद्योग, पर्यावरणाशी संबंधित नवीन उद्योग उभारण्यासाठी मदत केली जाणार आहे.

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादितने मुंबईत आयोजिलेल्या महाप्रित हरितनिधी गुंतवणूक बैठकीत विविध २२ प्रकल्पांसाठी तब्बल २५ हजार ३६१ कोटी रूपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन, रूरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन, इरेडा, ग्रो बेटर ॲग्री ओव्हरसीज, इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांच्यासह अनेक नामवंत कंपन्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या प्रकल्पांमुळे नागपूर महानगरपालिका आणि महाप्रित यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत पात्र स्थानिक उद्योजकांना उद्योग सुरू करण्यास मदत होऊन समाजातील दुर्बल घटकांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

महाप्रितने ग्रीन फंड इन्व्हेस्टर मिट-२०२२ आयोजित केली होती. यामध्ये विकासक व गुंतवणूक संस्था यांना एकाच व्यासपीठावर आणून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीची साखळी निर्माण करण्याचा संकल्प महाप्रितने केला.

पुणे महानगरपालिकेबरोबर ऊर्जा बचत, कमांड कंट्रोल

सिस्टीम, ५० मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प इत्यादी महत्वाकांक्षी प्रकल्प महाप्रितने हाती घेतले आहेत. त्याचे कामकाजही गतीने सुरु केले आहे. महाप्रित कंपनीने दिनांक ७ एप्रिल रोजी पुणे महानगरपालिकेसोबत ऊर्जेची व ऊर्जा खर्चाचे बचत धोरण यासाठी उपाययोजना करण्यासाठीच्या प्रकल्पांसाठी सामंजस्य करार केला आहे. नागपूर महानगरपालिकेसोबतही महाप्रितने ऊर्जा बचतीचा सामंजस्य करार केला आहे. या प्रकल्पांमुळे नागपूर महानगरपालिका आणि महाप्रित यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत पात्र स्थानिक उद्योजकांना उद्योग सुरू करण्यास मदत होऊन समाजातील दुर्बल घटकांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**करारांमधून रोजगारनिर्मितीची अपेक्षा**





सर्वाधिक करार हे नूतनीय ऊर्जा क्षेत्रातील आहेत. साधारण ५० मेगावॅटमागे ८० प्रत्यक्ष रोजगार निर्मित होतो. यामध्ये जवळपास १० हजार मेगावॅट नूतनीय ऊर्जेचे करार झाले आहेत. याखेरीज प्रत्यक्ष रोजगाराच्या तीनपट अधिक अप्रत्यक्ष रोजगार असतात. त्यानुसार हा आकडा फार मोठा असेल. सामंजस्य करारांत काही रस्ते कामांचादेखील समावेश आहे. यासाठीच्या रोजगाराचा आकडा हा नूतनीय ऊर्जेहून अधिक असतो.

**करारांचे निकाल**

एकूण करारांत सर्वाधिक करार सौरऊर्जेचे आहेत. सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प तुलनेने लवकर उभे राहतात. पॅनेल बसवून काही पायाभूत सुविधा उभ्या करून तात्काळ निर्मिती करता येते. असे करार सुमारे २० हजार कोटींचे आहेत. एकट्या पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने १४ हजार कोटींच्या सौरऊर्जा प्रकल्पासाठी करार केला आहे. हे सर्व प्रकल्प सुरू होऊ शकणार आहेत. त्यानुसार राज्याच्या नूतनीय ऊर्जा क्षेत्रात २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे.

**महाप्रितचे पुढील नियोजन**

'महाप्रित' ही नूतनीय ऊर्जेसाठी स्थापन झालेली कंपनी असली तरी पायाभूत सुविधा तंत्रज्ञानाचादेखील समावेश आहे. त्यानुसार पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी 'फ्लाय ॲश'चा अधिकाधिक वापर करण्यासाठी कंपनी काम करीत आहे. राष्ट्रीय महामार्ग उभारणीसाठी भूसंपादन करून दिले जाणार आहे. लवकरच डिजिटल विद्यापीठदेखील उभारले जाईल. या २५ हजार ३६१ कोटींखेरीज सुमारे ७० हजार कोटी रुपयांचे करार 'महाप्रित' ने याआधीच केले आहेत. तसेच तेवढी गुंतवणूक कंपनीकडे येत आहे. त्यातून कंपनीचा विस्तार मोठा असेल

**स्टार्टअप ज्ञान केंद्र**

मागासवर्गीय घटकांच्या सामाजिक उत्थानाला चालना देण्यासाठी तसेच या प्रवर्गातील व्यक्तींच्या सामाजिक विकासासाठी व्यावसायिक व रोजगारक्षम शिक्षण देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) च्या अंतर्गत ज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. महाप्रित स्टार्टअप ज्ञान केंद्र या नावाने संस्थेच्या स्वरूपात स्थापित केंद्रामुळे तरुणांना व्यावसायिक संधी देण्यासाठी सक्षम बनवले जाईल. महाप्रितच्या संचालक मंडळाच्या बैठकीत राष्ट्रीय शिक्षा धोरणाचे (एनईपी) उद्देश पूर्ण करण्यासाठी डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे एक उद्दिष्ट वर्तमान एकूण नोंदणी प्रमाण २६ ते ५० पर्यंत वाढवणे हे असल्याने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. पारंपरिक विद्यापीठाला डिजिटल ॲप्लिकेशन्स म्हणून चालविणाऱ्या सर्व ॲप्लिकेशन्सचा डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये समावेश करण्यात येणार आहे. या नव्याने उभारण्यात येणाऱ्या केंद्राच्या मदतीने तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जाईल.

**रोजगार निर्मितीची साखळी निर्माण होण्यास मदत– मुख्यमंत्री**

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित अर्थात महाप्रितच्या हरित निधी गुंतवणूकदार बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

अलीकडच्या, नविनीकरणीय ऊर्जा, पायाभूत प्रौद्योगिकी, सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्स व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचा वाढता वापर लक्षात घेता कंपनीच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. पुणे महानगरपालिकेबरोबर ऊर्जा बचत, कमांड कंट्रोल सिस्टीम, ५० मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प इत्यादी महत्वाकांक्षी प्रकल्प महाप्रितने हाती घेतले आहेत. त्याचे कामकाजही गतीने सुरु केले आहे. नागपूर महानगरपालिकेसोबतही महाप्रितने ऊर्जा बचतीचा सामंजस्य करार केला आहे, ही चांगली बाब आहे.

मेसर्स ब्रॉडकास्ट इंजिनियरिंग कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड (बेसिल) (केंद्र शासनाच्या डिपार्टमेंट ऑफ टेलिकम्युनिकेशन) नवी दिल्ली या कंपनीला मुंबई महानगर क्षेत्रात ६७ इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचा कार्यादेश देण्यात आला आहे. सांगली येथील मागासवर्गीय समाजाच्या बांधवांसाठी महारवतनाच्या जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्पाची संकल्पना व त्याद्वारे मागासवर्ग लाभार्थ्यांना रोजगार व उत्पन्नाचे साधन मिळवून देण्याचे १३५ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचे महाप्रित कंपनीने ऊर्जा विभागाकडे सादरीकरण केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाने त्याला मान्यता दिली आहे. अशा प्रकारची संकल्पना असणारा हा देशातला पहिलाच पथदर्शी प्रकल्प होईल. महाप्रित कंपनी स्वबळावर आर्थिक स्त्रोतामार्फत हे प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करत आहे, हे कौतुकास्पद आहे.

**डिजिटल विद्यापीठ काय करणार ?**

डिजिटल विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्यातील दुर्बल घटक आणि अनुसूचित जाती घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करेल. जेणेकरून त्यांच्या अंतर्गत अर्थसाहाय्य (क्रॉस सबसिडी) एसपीव्ही बनवता येईल. त्याचप्रमाणे डिजिटल विद्यापीठाच्या गैर–भौतिक मर्यादा मान्य करून त्याद्वारे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ (एमपीबीसीडीसी) आणि महाप्रितच्या दुर्बल घटकांच्या लाभार्थ्यासाठी संसाधने निर्माण करता येतील.

बिपीन श्रीमाळी, व्यवस्थापकीय संचालक, महाप्रित, मुंबई.

महाराष्ट्र मॅन्ग्रोव्ह संवर्धन प्रकल्प अंतर्गत मुंबई महानगरपालिकेच्या पी. नॉर्थ ब्लॉकमध्ये मालाडच्या मढ आयलंड खाडीतील मॅन्ग्रोव्ह क्षेत्राचे सॅम्पलिंग व डेब्रिजचे कोन्टिफिशनची कामगिरी महाप्रितच्या हवामान बदल उपविभाग अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपविभाग जिल्ह्याच्या सनियंत्रण खाली करण्यात येत आहे. महाप्रितच्या वतीने महाप्रित महिला सहाय्यित विकार्बनीकरण पहल उपक्रमाचे कार्बन क्रेडिट कार्यक्रम अंतर्गत सुधारित निर्धुर चुलींचे लाभार्थ्यांना निशुल्क वाटप करण्यात येणार आहे. मुंबई उपनगर, नागपूर व ठाणे जिल्ह्यातल्या लाभार्थ्यांना सुधारित निर्धुर चुलींचे वाटप केले. या सुधारित निर्धुर चुलींमुळे महिलांचे धुरामुळे होणारे आरोग्याचे प्रश्न सुटणार असून इंधन बचत होणार आहे तसेच पर्यावरणाचा ऱ्हास थांबण्यास मदत होणार आहे. महाप्रित कार्यालयास इथिओपियाचे मंत्री (जल व ऊर्जा) यांनी २६ जुलै २०२२ रोजी भेट दिली. महाप्रितची कार्यपद्धती व उपलब्ध तज्ज्ञ मानव संसाधनाची प्रशंसा केली. इथिओपिया देशात सौर ऊर्जा प्रकल्पासह अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहन (EV) चार्जिंग स्टेशन, कृषी प्रक्रिया मुख्य साखळी, परवडणारी घरे तसेच गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी महाप्रित कंपनीच्या अधिकाऱ्यांना आमंत्रित केले असून संयुक्त सामंजस्य करार

## मागासवर्गीय घटकांसाठी उत्तम काम: आठवले

**महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित अर्थात महाप्रितच्या हरित निधी गुंतवणूकदार बैठकीला केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी शुभेच्छा दिल्या. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने एप्रिल २०२१ मध्ये महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित अर्थात महाप्रित म्हणून वेगळी उपकंपनी स्थापन केली. खऱ्या अर्थाने समाजातील मागासवर्गीय घटकांसाठी ही कंपनी काम करते, हे खूप कौतुकास्पद आहे.**

**महाप्रित कंपनी मुंबई महानगर क्षेत्रात ६७ इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन्स उभारणार आहे. सांगली येथील मागासवर्गीय समाजाच्या बांधवांसाठी महारवतनाच्या जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्पाची संकल्पना व त्याद्वारे मागासवर्ग लाभार्थ्यांना रोजगार व उत्पन्नाचे साधन मिळणार असल्याचे ते म्हणाले.**

करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. नुकतेच महाप्रित कंपनीने इंडो ब्रिटीश बिझनेस फोरम यांच्यासोबत विविध प्रकल्पांसाठी सामंजस्य करार केला आहे. याद्वारे महाप्रित कंपनीच्या विविध प्रकल्पांकरिता लागणारे भांडवल इंडो ब्रिटीश बिझनेस फोरमतर्फे उपलब्ध करण्यात येणार आहे.

महाप्रित कंपनीतर्फे भविष्यामध्ये विविध प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. सांगलीमध्ये १५० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प, विविध महामार्गावर इलेक्ट्रीक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन्स होणार आहेत. यामध्ये मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर १० चार्जिंग स्टेशन्स, मुंबई शहरासाठी ६७ केंद्रे, मुंबई-नागपूर महामार्गासाठी ७० केंद्रे, नाशिकसाठी १०६ केंद्रे, पुणे, नागपूर महानगरपालिकेसाठी २०० केंद्रे सुरू होणार आहेत. सॉफ्टवेअर तंत्रज्ञान पार्क आणि डेटा सेंटरसाठी ठाणे जिल्ह्यातील जांभूळ गावात १० एकर क्षेत्रात सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कची उभारणी होईल. पायाभूत सुविधा तंत्रज्ञान प्रकल्पासाठी इन्फ्रा प्रोजेक्ट डिव्हिजनच्या माध्यमातून महाप्रित रस्ते आणि नागरी वाहतूक पायाभूत सुविधा प्रकल्प उभारणार आहे. तसेच परवडणाऱ्या घरांची निर्मितीही करणार आहे. हा संकल्प लवकरच पूर्ण होईल, याची खात्री असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र राज्य प्रगतीपथावर-उपमुख्यमंत्री**

महाप्रित कंपनीचे सद्यस्थितीत सुरु असलेले प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. शेतीमालाव्दारे अन्न, चारा, फायबर, इंधन, औद्योगिक कच्चा माल तयार करण्यासाठी शेतीमालाचे संवर्धन आणि हाताळणी करणारी टेक्नोइकॉनॉमिक क्रिया म्हणजे कृषी प्रक्रिया उद्योग. मागासवर्गीय तसेच ग्रामीण जनतेला समाजाला रोजगाराच्या अधिकाधिक संधी मिळाव्यात यासाठी जिल्हास्तरावर विभागनिहाय कृषीमाल प्रक्रिया केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. CFC अंतर्गत स्टोरेज फॅसिलिटी, स्वच्छता, ग्रेडिंग, पॅकिंग स्थापन होतील. या कार्यक्रमासाठी चालू आर्थिक वर्षात रु. ३४५ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात येत आहे. त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागाच्या समन्वयाने पथदर्शी प्रकल्प प्रथमच राज्यामध्ये राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याशिवाय दाळ मिल, पीठ गिरणी, तेल घाणी, चिप्स मेकिंग, मल्टीग्रेन क्लिनिंग युनिट्स स्थापन होतील. कृषी मालावरील प्राथमिक आणि दुय्यम प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळेल तसेच यामध्ये मागासवर्गीय समाजातले लाभार्थी असतील.

पर्यावरण आणि हवामान बदलामध्ये नाशिक महानगरपालिकेच्या सिव्हेज ट्रीटमेंट प्लांटची कार्यक्षमता तपासून योग्य उपाययोजना करण्यात येणार आहे. तसेच नव्याने विकसित होणारी तंत्रज्ञानाची क्षेत्रे यामध्ये १ मेगावॅट क्षमतेचा ग्रीन हायड्रोजन प्रकल्प नागपूर व सोलापूर येथे १०० टीपीडीचा बायोमास पॅलेट प्रकल्प, फिड्स स्टॉकवर आधारित १०० टीपीडीचा बायोगॅस/बायो सीएनजी प्रकल्प, महागणी (Mahogafi) झाडांचे कार्बन क्रेडिट कार्यक्रम प्रकल्प, बायोमास व महानगरपालिकेचा घनकचऱ्यापासून ग्रीन हायड्रोजन निर्मितीचा प्रकल्प, सौर चुलीचे वाटप होणार आहे.

म.फु.मा.वि.महामंडळाच्या सर्व श्रेणीतील उपलब्ध लाभार्थींना महाप्रितच्या वेगवेगळ्या व्हर्टिकल अंतर्गत इतर प्रकल्पांशी जोडून त्याद्वारे मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याचा आणि महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार या प्रकल्पातून उपलब्ध होणारा अतिरिक्त महसूल/नफा मागासवर्ग लाभार्थ्यांकडे वळविण्याचा/वापरण्याचा महाप्रितचा मानस आहे.

AIGEP म्हणजे Alternative, Innovative, Generation of Employment Program असा आहे. त्याचा मराठीत अर्थ सामाजिक बांधिलकीची द्विसूत्री असा आहे. या योजनेत प्रामुख्याने दोन प्रकारचे प्रकल्प राबविण्यात येणार आहे. (A) मागे वळून पहा (Non Resident Maharashtrian Leverage) सदर योजनेमध्ये जो महाराष्ट्रीयन समाज परदेशात कार्यरत आहे व तेथे स्थायिक झाला आहे त्याला त्याच्या गावाकरीता, समाजाकरिता काही योगदान/काम करण्यासाठी आमंत्रित करण्यात येईल व जे बांधव योजनेला अर्थसहाय्य करावयास इच्छुक आहेत त्यांच्या मदतीने मागासवर्गीय घटक व नवबौध्दांकरिता विविध समाजउपयोगी योजना / कामे करण्यात येतील.

(ब) स्वांत सुखाय प्रकल्प : 'स्वांत सुखाय' युक्तीचा वापर MPBCDC/MAHAPREIT चे अधिकारी /कर्मचारी त्यांच्या सहभागातून समाजउपयोगी व समाजातील गरीब गरजू व्यक्तींना मदत करत मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य करु शकतात व त्यामुळे सामाजिक बाधिलकी जोपासता येते. सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महाप्रितच्या संचालक मंडळाने मंजूरी दिलेली आहे. व ही योजना सर्व MPBCDC/MAHAPREIT च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहभागातून लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येणार आहेया सर्व व्हर्टिकल अंतर्गत वेगवेगळे प्रकल्प हाती घेऊन व अंमलबजावणी करून राज्याच्या मागासवर्ग व दुर्बल घटकांना स्वयंरोजगार व रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहेत.